देशोन्नती

# श्री समर्थ विद्यालय येथे सायबर सुरक्षेवर कार्यशाळा

**गायगाव** ■ तालुक्यातील गायगाव येथील श्री समर्थ विद्यालयात सायबर गुन्हे जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सायबर क्राईम हे आंतरराष्ट्रीय समस्या झाली असून विद्यार्थ्यांनी त्याबाबत सावधगिरी बाळगावी. व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, फोन पे, गुगल पे आदींचा वापर सध्या सर्वच क्षेत्रात होत आहे. लोन फ्रॉड, फेस फ्रॉड, वाईस फ्रॉड यापासून विद्यार्थ्यांनी सावध कसे राहावे हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. ओटीपीचा नेमका अर्थ काय आहे. अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीमुळे फसवणुक होऊ शकते. त्यातून गंभीर स्वरूपाचा गुन्हा अथवा नुकसान होऊ शकते. यासाठी विद्यार्थ्यांनी इंटरनेट, मोबाइल वापरताना विशेष काळजी घ्यावी असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील अभिषेक बाजड आणि निशांत आगरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रशिक्षण दिले.

ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व 'क्विकहिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ.जे. एम. साबू आणि उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच.जे. खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य विलास बेलुरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.